**<u>मे. केल्टेक एनर्जीज लिमिटेड या कंपनीद्वारे गरमसूर, पो.दुधाळा, ता.काटोल, जि.नागपूर येथे नवीन स्फोटक उत्पादनांसह विद्यमान स्फोटक उत्पादनाच्या विस्तारीकरणासाठी प्रस्तावित प्रकल्पाची दि. १७/०५/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.</u>**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये मे.केल्टेक एनर्जीज लिमिटेड या कंपनीद्वारे गरमसूर, पो.दुधाळा, ता.काटोल, जि.नागपूर येथे नवीन स्फोटक उत्पादनांसह विद्यमान स्फोटक उत्पादनाच्या विस्तारीकरणासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १७/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्पाचे स्थळ मे.केल्टेक एनर्जीज लिमिटेड, गरमसूर, पो.दुधाळा, ता.काटोल, जि.नागपूर येथे श्री. अनुप खांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर ह्या म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्रीमती. धनश्री पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी समन्वयक म्हणून काम केले व अध्यक्षांच्या संमतीने दुपारी १२.०० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र-१).**

**<u>पार्श्वभूमी</u>**

मे.केल्टेक एनर्जीज लिमिटेड या कंपनीद्वारे गरमसूर, पो.दुधाळा, ता.काटोल, जि.नागपूर येथे विद्यमान उत्पादन क्षमतेसाठी, पर्यावरण मंजुरी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली कडुन क्रमांक F.No. IA-JA-११०११८३६०/२०१८-IA II (I) द्वारे दिनांक १४/०७/२०२० रोजी प्राप्त केली गेली. या कंपनीने आता नवीन स्फोटक उत्पादनांच्या समावेशासह प्रस्तावित प्रकल्प विस्ताराची योजना आखली आहे. त्या अनुषंगाने पर्यावरणीय अनुमती मिळण्याकरिता उद्योगाने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी म.प्र .नि मंडळाकडे अर्ज केला असून सदर लोकसुनावणी दि. १७/०५/२०२५ रोजी घेण्यात आली.

**<u>प्रयोजन व कार्यपध्दती</u>**

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा.अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक १५/०४/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

..२/-

२) श्री. बंडु राठोड, माहुरखोरा, ता.काटोल, जि.नागपूर.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कंपनीच्या प्रदूषणामुळे शेतपिकांचे नुकसान व रोगराईवर परिणाम होत असून भूजलातील पाण्याची पातळी ही कमी झालेली आहे. तसेच स्थानिकांनाच रोजगार दयावा. | या सूचनेची नोंद घेतली असून. याबाबत प्रकल्प धारकाने स्पष्ट केली की, सद्यस्थितीत त्यांच्याकडे २४००० घनमीटर क्षमतेचे जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) करण्यात येते. याकरीता विद्यमान उद्योगामध्ये ३ तलाव अस्तित्वात आहेत. या तलावातील पाणी जमिनीमध्ये झिरपून भूजलाची पातळी वाढण्यास मदत होईल.प्रस्तावित प्रकल्पामध्ये स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य देण्यात येईल. |

३) श्री. यशवंत पवार, गरमसुर, ता.काटोल, जि.नागपूर.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | स्पोटकांचा मोठ्या प्रमाणात आवाज होतो. तसेच परिसरातील शेतकऱ्यांचे पिकांचे उत्पादन कमी होते. | ब्लास्टींगकरीता अद्यावत यंत्रणेचा वापर करण्यात येईल, जेणेकरून ध्वनी प्रदूषण होणार नाही याची दक्षता घेतली जाईल. |

४) श्री. रामराव चव्हाण. सदस्य,ग्रा.पं. माहुरखोरा, ता.काटोल,जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | कंपनीच्या स्फोटकामुळे घराला हादरे बसतात, नुकसान झाल्यास भरपाई देण्यात यावी. परिसरातील विहिरी व बोरवेलच्या पाण्याची पातळी कमी असल्यामुळे शेतपिकांचे उत्पादन कमी होते. | ब्लास्टींगकरीता अद्यावत यंत्रणेचा वापर करण्यात येईल, जेणेकरून परिसरातील गावांना हादरे बसणार नाही याची दक्षता घेतली जाईल. विद्यमान उद्योगामध्ये ३ तलाव अस्तित्वात आहेत. या तलावातील पाणी जमिनीमध्ये झिरपून भूजलाची पातळी वाढण्यास मदत होते. तसेच प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, जलपूर्नभरणासाठी (Rainwater Harvesting) तलावाची क्षमता वाढविण्यात येईल, जेणेकरून परिसरातील विहिरी व बोरवेलच्या पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल. |

५) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रकल्पास समर्थन दर्शविला, रोजगार उपलब्ध होईल. पावसाचे पाणी गोळा करून जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) उभारावे. प्रकल्पाचे स्वागत आहे.<br>पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयांनी या प्रस्तावित प्रकल्पास विना अटी व शर्तीसह परवानगी दयावी. | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, विद्यमान प्रकल्पामध्ये परिसरातील पावसाचे पाणी गोळा करून जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) करण्यात येते. तसेच प्रस्तावित प्रकल्पामध्ये सुध्दा परिसरातील पावसाचे पाणी गोळा करून जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) करण्यात येईल. |

त्यानंतर श्रीमती. हेमा देशपांडे, सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर यांनी प्रकल्प प्रवर्तकास सूचना केल्या की, प्रदूषणाबाबत योग्य त्या उपाययोजना कराव्यात. तसेच हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा योग्यरित्या चालवावी व हवा प्रदूषण करणारे घटक विहित मर्यादेत असावे, याचे काटेकोरपणे पालन करावे, जेणेकरून परिसरातील नागरीकांना त्रास होणार नाही.

सामाजिक व पर्यावरणावर काय परिणाम होईल याची माहिती लोकांना दयावी. तसेच स्फोटकामुळे गावात दुर्घटना झाल्यास गावांसाठी काय करणार याची माहिती त्यांना दयावी. उपस्थित जनतेच्या सूचनांची दखल घेवून ही समिती जसेच्या तसे अहवाल शासनास सादर करेल व याबाबत केंद्र सरकारकडून निर्णय घेतला जाईल.

श्री. अनुप खांडे अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर, यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली. या प्रकल्पामुळे परिसरात सामाजिक बदल, पर्यावरणावर काय परिणाम होईल याबाबत अहवाल पर्यावरण समितीला पाठविण्यात येतो. जलसंवर्धनासाठी योग्य अशासकीय संस्थेचा उपयोग करावा, त्यामुळे पाण्याची समस्या सुटेल, आपातकालीन व्यवस्थापन करावी व परिसरातील ग्रामपंचायतीसाठी जनसंपर्क अधिकारी नेमावे. कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचा खर्च फार कमी असून तो वाढवावा. तसेच जर कुणाच्या लेखी सूचना किंवा निवेदन असतील त्यांनी समितीकडे जमा करावे किंवा दि.१९/०५/२०२५ पर्यंत म.प्र.नि.मंडळ, कार्यालय, नागपूर अथवा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे जमा करण्याबाबत सुचित केले. तसेच उपस्थित जनतेचे आभार मानले. त्यानंतर सदर पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

21/05/2025.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(धनश्री पाटील)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-१

(अनुप खांडे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर